# महाराष्ट्र शासन

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

सत्यमेव जयते

# बाष्पके संचालनालय

## महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ०५१.

*संवेदनशील, विज्ञानधारित, प्रभावी व गतिमान प्रशासन*

# -: नागरिकांची सनद :-

## (CITIZENS◦ CHARTER )

दिनांक १३.०८.२०२५ पर्यंत सुधारीत

" कामगार भवन ", सातवा मजला, भुखंड क्रमांक सी-२०, ब्लॉक - ई,
वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व ), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी : ०२२ २६५७१३०२, २६५७१२०१.
ई मेल - dirsb.mumbai@maharashtra.gov.in संकेतस्थळ - www.mahaboiler.in

## -: नागरिकांची सनद:-

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नागरिकांची सनद- ध्येय, उद्दिष्टे व कार्यप्रणाली | ३ |
| २ | कार्यालयांचे पत्ते, दुरध्वनी क्रमांक व ई मेल | ६ |
| ३ | संघटनात्मक तक्ता | ८ |
| ४ | बाष्पकांच्या निरीक्षणा विषयी | ९ |
| ५ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत ऑनलाईन व ऑफलाइन स्वरूपात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लोकसेवा | १० |
| ६ | बाष्पके संचालनालया तर्फे पुरविल्या जाणाऱ्या ईतर सेवा- | |
| | अ) वेल्डींग इलेक्ट्रोडची आरंभीची (Initial Qualification test)/ नियतकालीक चांचणी (Periodical test) | १७ |
| ७ | स्वाक्षरीसाठी सादर करावयाची प्रमाणपत्रे | १८ |
| ८ | शासन पातळीवर निर्णय घेण्यासाठी सादर करावयाचे प्रकरण | १९ |
| ९ | बाष्पक परिचर नियम २०११ व बाष्पक प्रचालन नियम २०२१ | २० |
| १० | नियम - २४. पृष्ठांकन | २१ |
| ११ | नियम-४४. नक्कल प्रत ( प्रमाणपत्राची दुसरी प्रत देणे) | २२ |

# - नागरिकांची सनद -

शासकीय व्यवहारात पारदर्शता आणून ती लोकाभिमुख करण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. जनतेला कमीत कमी वेळात चांगली सेवा मिळण्याच्या दृष्टिने संचालनालयातील प्रत्येक विभागात चालणा-या कामकाजाची कार्यपध्दती जाणुन घेण्याचा सर्वसामान्य नागरीकांचा हक्क आहे. सर्व सामान्यांच्या या संचालनालयाकडुन असलेल्या अपेक्षा पुर्ण करण्याच्या दृष्टिने सदर नागरिकांची सनद तयार करण्यात आली आहे. या सनदेमुळे जनतेला लाभ होऊन शासन प्रभावी, लोकाभिमुख व गतिमान होईल असा दृढ विश्वास या संचालनालयाला वाटतो.

बाष्पक हा शब्द बॉयलर या अर्थाने सामान्य जनतेला ज्ञात आहे. बाष्पक हे उपकरण पाण्यापासून वाफ निर्माण करते. या वाफेच्या दाबावर मोठ-मोठी यंत्रे गतिमान होतात. सायझिंग, तेल गिरण्या, कापड गिरण्या, रासायनिक कारखाने, खत निर्मिती कारखाने, पेट्रोलजन्य उत्पादने, प्रक्रिया कारखाने, साखर कारखाने व ऊर्जा निर्मिती कारखाने (पॉवर स्टेशन) अशा लहान मोठया उद्योगांमध्ये बाष्पकांची गरज असते. हे यंत्र जसे अतिशय उपयुक्त आहे तसेच ते अत्यंत स्फोटक व धोकादायक आहे. अपघात झाल्यास जिवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर होऊ शकते. १८६९ साली मुंबई शहरात बाष्पकामुळे दोन भीषण अपघात झाले. त्यामध्ये जिवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर झाली. त्याच वर्षी म्हणजेच सन १८६९ साली मुंबई राज्याच्या बाष्पक विभागाची स्थापना झाली. पुढे भारतीय बाष्पक अधिनियम,१९२३ हा कायदा राष्ट्रीय स्तरावर अस्तिवात आला. बाष्पकाचे संकल्पचित्र, विर्निधिष्ठीत प्रमाणपत्र , रेखाचित्र आणि बाष्पकाची निर्मिती, नोंदणी व निरीक्षण इ. बाबतचे विनियम अंतर्भुत केलेला भारत सरकारचा भारतीय बाष्पके विनियम,१९५० अस्तित्वात आला. त्यानंतर अधिनियमाच्या आधारे महाराष्ट्र बाष्पक नियम,१९६२ व महाराष्ट्र मितीपयोजक नियम,१९६५ हे अस्तित्वात आले. भारतीय बाष्पके अधिनियम, इ.स. २००७ व इ.स.२०२५ मध्ये सुधारणा होऊन, सुधारित “बाष्पके अधिनियम २०२५” असा करण्यात आला. मार्च- २०११ मध्ये “बाष्पक परिचर नियम २०११” व वर्षे फेब्रूवारी- २०२१ मध्ये “बाष्पक परिचालन अभियंता नियम २०२१” असे अस्तित्वात आले.

१) ध्येय, उददीष्टे व सामाजिक बांधिलकी - राष्ट्रहिताच्या दृष्टिने मनुष्यबळ व राष्ट्राची संपत्ती याचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अपघातापासून संरक्षण व जतन करणे आणि राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीस अधिक गतिमान करण्यामध्ये हातभार लावणे.

२) जनतेचा हक्क - उद्योजकांस उद्योग धंद्याच्या उत्कर्षाला व उत्पादनासाठी बाष्पक यंत्रासारखे अत्यंत धोकादायक व स्फोटक परंतु अत्यंत उपयोगी यंत्र खरेदी करणे व त्याचा नियमानुसार वापर करण्याचा हक्क आहे.

सदर बाष्पक जसे अत्यंत उपयोगी आहे तसेच ते स्फोटक व धोकादायक आहे. त्यास अपघात झाल्यास मोठया प्रमाणावर जिवित व वित्त हानी होऊ शकते. त्यामुळे जनतेचे व राष्ट्राचे नुकसान होऊ शकते. म्हणूनच ते नियमानुसार वापरले पाहिजे.

## बाष्पकाची कायद्यात्मक व्याख्या -

**बाष्पक म्हणजे बंद पात्राचा दाबाखाली विशेषकरुन बाष्प निर्मितीसाठी उपयोग करण्यात येतो असे कोणतेही बंद पात्र आणि** या संज्ञेत, अशा पात्रास जोडलेले जे आवरण किंवा इतर जोड काम बंद केले असता अंशत: किंवा पुर्णत: वाफेच्या दाबाखाली असते त्या आवरणाला किंवा जोडकामाचा अंतर्भाव होईल, तसेच त्यामध्ये खालील अंतर्भाव होणार नाहीत.

१) २५ लिटर किंवा त्यापेक्षा कमी धारण क्षमता असलेल्या ( जी फीड चेक व्हॉल पासुन मेन स्टिम स्टॉप व्हॉल पर्यंत येते ती)
२) ज्याचे डिजाईन गेज प्रेशर व वर्किंग गेज प्रेशर १ कि.ग्रॅ./चौ.से.मी. किंवा त्यापेक्षा कमी असेल.
३) ज्यामध्ये पाण्याचे तापमान १०० डिग्री सेंटीग्रेड किंवा त्यापेक्षा कमी असेल.

## सुट प्राप्त बाष्पक -

१) या अधिनियमाच्या , कलम २ (क) मध्ये, धारणक्षमता, बाष्पदाव किंवा तापमान याच्या मर्यादेंपेक्षा कमी असलेले **बाष्पक.**

२) रेल्वे कंपनीच्या मालकीची किंवा नियंत्रणाखाली असलेली बाष्पके (Locomotive Boilers).

३) कोणत्याही नौका ज्या की पूर्णतः किंवा अंशतः वाफेवर चालविल्या जात असतील त्यांची बाष्पके किंवा बाष्पकाचा भाग.

४) थल सेना, नौसेना किंवा वायुसेना यांच्या मालकीची किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेली बाष्पके किंवा बाष्पकाचा भाग.

५) ज्या बाष्पकाची धारण क्षमता १०० लिटरपेक्षा अधिक नसेल अशा सर्वसाधारण रुग्णालयात वापरल्या जाणा-या निर्जतुंकरण यंत्राशी किंवा जंतुनाशक उपकरणाशी संबंध असलेले बाष्पक किंवा बाष्पकाचा भाग.

**मितीपयोजक** म्हणजे वाया जाणा-या उष्णतेचा पुन्हा उपयोग करुन घेण्यासाठी ज्वलनवायुच्या वहन मार्गात / प्रक्रियेत पूर्णत: किंवा अंशत: उत्सर्जित असा भरणनलिकेचा कोणताही भाग.

**बाष्पनलिका म्हणजे ज्या नलिकेमधून पुढील परिस्थितीत वाफ प्रवाहीत होते ती नलिका.**

१) १ अशा नलिकेतून ज्या दाबाखाली वाफ प्रवाहीत होते तो दाब जर वातावरणाच्या दाबापेक्षा दर चौरस सेंटिमीअरला ३.५ किलो ग्रॅम हून अधिक असेल तर किंवा

२) जर अशा नलिकेचा आंतरिक व्यास २५४ मिलीमीटरपेक्षा अधिक असेल तर आणि त्यातून प्रवाहित होणा-या वाफेचा दाब जर वातावरणाच्या दाबापेक्षा दर चौरस सेंटिमीअरला १ किलो ग्रॅम हून अधिक असेल तर आणि या संज्ञेत, दोन्ही बाबतीत बाष्पकनलिकेस जोडण्यात आलेल्या कोणत्याही जोडणीचा अंतर्भाव होतो.

## विभागीय कार्यालयांचे पत्ते, दुरध्वनी व ई- मेल

| अ.क्र. | कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी व ई मेल | प्रमुख अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | **संचालक, बाष्पके,**<br>**बाष्पके संचालनालय,**<br>कामगार भवन, ७ वा मजला, भुखंड क्रं.२०, ब्लॉक - ई,<br>वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.<br>दुरध्वनी : ०२२ २६५७११९८ / २६५७१३५२ / २६५७१३०४<br>फॅक्स : ०२२ २६५७१२८३.<br>e-mail ID : dirsb.mumbai@maharashtra.gov.in | संचालक<br>(विभाग प्रमुख) | महाराष्ट्र राज्य तसेच बृहन्मुंबई , ठाणे, रायगड आणि पालघर |
| २ | **सह संचालक, बाष्पके,**<br>**बाष्पके संचालनालय,**<br>कामगार कल्याण भवन, दुसरा मजला,<br>संभाजीनगर, चिंचवड, पुणे- ४११ ०१९.<br>दुरध्वनी : ०२०-२७३७१६९७<br>e-mail ID : jtdirsb.pune@maharashtra.gov.in | सहसंचालक<br>( प्रादेशिक प्रमुख) | पुणे व सातारा |
| ३ | **सह संचालक, बाष्पके,**<br>**बाष्पके संचालनालय,**<br>कै.ना.म.लोखंडे. महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, निवासी इमारत क्र.३<br>गायत्री नगर, आयटी पार्क जवळ, व्हीएनआयटीच्या समोर,<br>परसोडी, नागपूर -४४० ०२२, दुरध्वनी : ०७१२ २५३११७०.<br>e-mail ID : jtdirsb.nagpur@maharashtra.gov.in | सहसंचालक<br>( प्रादेशिक प्रमुख) | नागपूर, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ,वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम व गोंदिया |
| ४ | **सह संचालक, बाष्पके,**<br>**बाष्पके संचालनालय,**<br>हरेश, १६ बिजली को. ऑप. हौ. सोसायटी,<br>शिला विहारजवळ, वसंत टेकडी, अहिल्यानगर - ४१४ ००३ | सहसंचालक<br>( प्रादेशिक प्रमुख) | अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड व परभणी |

| | | | |
|---|---|---|---|
| | दुरध्वनी : ०२४१ २४२१७४५.<br>e-mail ID : jtdirsb.ahmednagar@maharashtra.gov.in | | |
| ५ | **सह संचालक, बाष्पके,**<br>**बाष्पके संचालनालय,**<br>गाळा क्रं. ४, उद्योग भवन, तळ मजला, त्रंबक रोड, सातपूर, नाशिक - ४२२ ००७<br>दुरध्वनी : ०२५३ २३५१०१६<br>e-mail ID : jtdirsb.nashik@maharashtra.gov.in | सहसंचालक<br>( प्रादेशिक प्रमुख) | नाशिक , धुळे, नंदूरबार आणि जळगाव |
| ६ | **सह संचालक, बाष्पके,**<br>**बाष्पके संचालनालय,**<br>पहिला व दुसरा मजला, बचतगंगा, शासकीय इमारत, रमणमळा, कसबा बावडा रोड, कोल्हापूर - ४१६ ०१२.<br>दुरध्वनी : ०२३१ २५२२९२०<br>e-mail ID : jtdirsb.kolhapur@maharashtra.gov.in | सहसंचालक<br>( प्रादेशिक प्रमुख) | सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी |
| ७ | **सह संचालक, बाष्पके,**<br>**बाष्पके संचालनालय,**<br>वीतराग व्हर्टेक्स, १ ला मजला, नवल पेट्रोल पंपसमोर, ८३ ए, रेल्वे लाईन्स, डफरीन चौक, सोलापूर -४१३ ००१.<br>दुरध्वनी : ०२१७ २३१७०१५<br>e-mail ID : jtdirsb.solapur@maharashtra.gov.in | सहसंचालक<br>( प्रादेशिक प्रमुख) | सोलापूर, धाराशिव (उस्मानाबाद), लातूर, हिंगोली व नांदेड |

प्रादेशिक प्रमुखांनी कोणतीही सेवा अथवा तक्रारीचे उत्तर विहीत कालावधीत न पुरविल्यास किंवा त्याबाबत समाधानकारक उत्तर न दिल्यास संचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे लेखी तक्रार करता येईल.

## बाष्पके संचालनालयाचा संघटनात्मक तक्ता

↓

**मुख्य कार्यालय, मुंबई.**

१ संचालक,बाष्पके

१ सहसंचालक, बाष्पके

९ उपसंचालक, बाष्पके

(बृहन्मुबई, ठाणे, रायगड, आणि पालघर जिल्हयात वापरात असलेल्या, तसेच निर्मिती चालू असलेल्या बाष्पकांचे आणि मितोपयोजकांचे निरीक्षण करण्यासाठी)

**मुख्य कार्यालय, मुंबई**

- १ रचना व कार्यपध्दती अधिकारी
- १ प्रणाली विश्लेषक
- १ तांत्रिक अधिकारी
  ५ तंत्र सहाय्यक

**विभागीय कार्यालये.**

| **पुणे** | **नाशिक** | **नागपूर** | अहिल्यानगर | **कोल्हापूर** | **सोलापूर** |
|---|---|---|---|---|---|
| १ सहसंचालक | १ सहसंचालक | १ सहसंचालक | १ सहसंचालक | १ सहसंचालक | १ सहसंचालक |
| ४ उपसंचालक | १ उपसंचालक | २ उपसंचालक | १ उपसंचालक | २ उपसंचालक | १ उपसंचालक |
| १ तांत्रिक अधिकारी | | | | | |
| २ तंत्र सहाय्यक | | | | | |

## (अ) बाष्पकाच्या निरीक्षणाविषयी

निरीक्षणाच्या वेळेस मालकाचे कर्तव्य : बाष्पक अधिनियम कलम १९ प्रमाणे मालकाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) बाष्पकाच्या तपासणीसाठी हया अधिनियमान्वये ठरविलेल्या कोणत्याही दिवशी बाष्पकाचा मालक पुढील गोष्टी करण्यास बांधिल राहिल, त्या गोष्टी अशा:-

अ) तपासणीसाठी निरीक्षकास लागणा-या योग्य त्या सर्व सोयी उपलब्ध करुन देणे व त्यास आवश्यक असलेली योग्य ती सर्व माहिती देणे.

ब) तपासणीसाठी विहित केलेल्या रीतीने बाष्पक योग्य रितीने तयार करणे व तो तपासणीसाठी तयार ठेवणे.

क) बाष्पकाची नोंदणी करण्यासाठी कलम १२ च्या पोट- कलम १ नुसार अर्ज केला असेल तर अशा बाबतीत विहित करण्यात आलेली रेखाचित्रे, विनिर्धिष्टीत प्रमाणपत्रे व इतर तपशील पुरविणे.

२) जर बाष्पकाचा मालक, योग्य कारणाशिवाय, पोट-कलम (१) मधील उपबंधाची अंमलबजावणी करण्यात कसूर करील तर, निरीक्षकास बाष्पकाची तपासणी करण्यास नकार देता येईल व तो ते प्रकरण संचालकांकडे पाठवील. संचालकांनी सदर प्रकरणामध्ये आढावा घेवून व बाष्पक मालकाने पुरेसे कारण दिल्यावर, कलम १२ **अन्वये नोंदणीसाठी** व कलम १३ अन्वये नूतणीकरणसाठी पुन्हा अर्ज करण्यास सूचित करतील. अशा प्रकरणांमध्ये कलम १५ लागू होणार नाही.

**०१. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत ऑनलाईन व ऑफलाइन स्वरूपात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लोकसेवा.**

शासन निर्णय क्रं - संकीर्ण २०२५/ प्र. क्रं. ४२/ कामगार ९ दिनांक ०९/०७/२०२५ परिशिष्ट -३ अनुसार आणि महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-१ -ल, असाधारण क्रमांक.५०, दि. ०४ सप्टेंबर २०२५, अधिसूचनेमधील अनुसूची क्रमांक-३ अनुसार या कार्यालय मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सर्व २९ सेवा त्याचा विहित कालावधी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी खालीलप्रमाणे आहेत.

**तक्ता - अ**

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मालकी हक्काचे हस्तांतरण | ७ दिवस | तांत्रिक अधिकारीनिरीक्षण / शाखेचा अधिक्षक, मुंबई | संहसंचालक,बाष्पके, मुंबईप्रादेशिक / कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २ | प्रमाणपत्राची नक्कल प्रत | ७ दिवस | तांत्रिक अधिकारीनिरीक्षण / शाखेचा अधिक्षक, मुंबई | संहसंचालक,बाष्पके, मुंबईप्रादेशिक / कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ३ | बाष्पके व मितीपयोजकांची नोंदणी, | ३० दिवस | संबधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ४ | बाष्पके व मितीपयोजकांच्या प्रमाणपत्राचे नुतनीकरण | १७ दिवस | संबधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | बाष्पके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ६ | बाष्पके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ७ | बाष्पकेमितीपयोजके/ उभारणीची मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ८ | बाष्पकेमितीपयोजके/ उभारणीच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ९ | मितीपयोजके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १० | मितीपयोजके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ११ | प्रेशर व्हेसल्स निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | प्रेशर व्हेसल्स निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १३ | प्रेशर पार्टस निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १४ | प्रेशर पार्टस निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १५ | हिट एक्सचेंजर निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १६ | हिट एक्सचेंजर निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १७ | स्मॉल इंडस्ट्रियल बाष्पके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १८ | स्मॉल इंडस्ट्रियल बाष्पके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | बाष्पके व मितीपयोजक दुरुस्तीकारांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २० | बाष्पके व मितीपयोजक दुरूस्तीकारांच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २१ | पाईप फॅब्रिकेटर म्हणून मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २२ | पाईप फॅब्रिकेटर म्हणून मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २३ | बाष्पके व मितीपयोजके नष्ट करणे | २३ दिवस | तांत्रिक शाखेचा तांत्रिक अधिकारी, बाष्पके, मुंबई | संहसंचालक,बाष्पके, मुंबईप्रादेशिक / कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २४ | बाष्पके व मितीपयोजके दुरुस्ती परवानगी पत्र | २ दिवस | संबधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी/ तांत्रिक शाखेचा तांत्रिक अधिकारी, बाष्पके, मुंबई व पुणे | संहसंचालक,बाष्पके, मुंबईप्रादेशिक / कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २५ | भारतात निर्मिती केलेल्या बाष्पके व बाष्पकांचे सुटे भाग यांचे डिझाइन आणि उत्पादन | १( ५ दिवस २० - टीपीएच क्षमतेपर्यंतच्या | तांत्रिक शाखेचा तांत्रिक अधिकारी, बाष्पके, मुंबई | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रेखाचित्रांना मान्यता पत्र | बाष्पकांचे सुटे भाग आणि बाष्पकासाठी २ दिवस १५ (- २० टीपीएच पेक्षा जास्त आणि १०० टीपीएच क्षमतेपर्यंतच्या बाष्पकांसाठी ३ दिवस २१ (- १०० टीपीएच क्षमतेपेक्षा जास्त असलेल्या बाष्पकांसाठी | | | |
| २६ | भारताबाहेरील बाष्पके व बाष्पकांचे सुटे भाग यांचे डिझाईन आणि उत्पादन रेखाचित्रांना मान्यता पत्र | २१ दिवस | तांत्रिक शाखेचा तांत्रिक अधिकारी, बाष्पके, मुंबई | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २७ | निर्मिती व चाचणीचे प्रमाणपत्र अबाष्पकाचे सुटे भाग ( बबाष्पक ( | ०३ दिवस<br>०७ दिवस | संबधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २८ | यूटीएम आणि इम्पॅक्ट टेस्टींग मशीनचे कॅलिब्रेशन प्रमाणपत्र | १७ दिवस | संबधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण | सहसंचालक, बाष्पके | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अधिकारीतांत्रिक शाखेचा / तांत्रिक अधिकारी, बाष्पके, मुंबई | संचालनालय,मुंबई/ प्रादेशिक कार्यालय | |
| २९ | सांधात्यांना फॉर्म XII मध्ये पात्रता प्रमाणपत्र जारी करणे | ०५ दिवस | संबधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई/ प्रादेशिक कार्यालय | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

**०२) बाष्पके संचालनालया पुरविल्या जाणाऱ्या ईतर सेवा-**

**अ ) वेल्डींग इलेक्ट्रोडची आरंभीची (Initial Qualification test)/ नियतकालीक चांचणी (Periodical test)**

| अ.क्र. | विभागाकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी | सेवा विहित कालावधीत परविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | निर्मात्याने संबंधित इलेक्ट्रोड संबंधीचे माहितीपत्रक व शासकीय कोषागारात विहित शुल्क प्राथमिक व नियतकालीक चाचणीसाठी भरलेले प्राप्त पोच चलन अर्ज सोबत सादर केलेल्या अर्जाचे परिनिरीक्षण व परवानगी देणे. | संचालक / तंत्र सहाय्यक | संचालक,बाष्पके,महाराष्ट्र राज्य, मुंबई. दूरध्वनी क्र : ०२२-२६५७१३५२/१२०१ |
| २ | संबंधीत संस्थेच्या कार्यशाळेत इलेक्ट्रोडची निवड करणे. | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | संचालक,बाष्पके,महाराष्ट्र राज्य, मुंबई. दूरध्वनी क्र : ०२२-२६५७१३५२/१२०१ |
| ३ | प्रयोगशाळेत संबंधीत इलेक्ट्रोडचा वापर करुन तयार सांध्यावरील धातक चांचण्या. | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | वरील चांचणी अहवालाचे परीनिरीक्षण व स्विकृती. | सहसंचालक / तंत्र सहाय्यक | |
| ५ | संबंधीत इलेक्ट्रोडस्ना पुढील वापरासाठी सहा महिने मुदतीचे प्रमाणपत्र देणे | संचालक / तंत्र सहाय्यक | संचालक,बाष्पके,महाराष्ट्र राज्य, मुंबई. दूरध्वनी क्र : ०२२-२६५७१३५२/१२०१ |

*** लहान औद्योगिक बाष्पकाबाबत :- वरील सर्व टप्प्यांपैकी काही टप्प्यांमध्ये भारतीय बाष्पके विनियम १९५० मधील विनियम ६२० (३) नुसार सूट देण्यात आलेली आहे.**

**०३) स्वाक्षरीसाठी सादर करावयाची प्रमाणपत्रे**

| | |
|---|---|
| १) बाष्पक व बाष्पकाचे भाग ---- | विहित प्रमाणपत्रे II-I. II-(२), II-A, II-B, III, IV-A व बांधणी नकाशे |
| २) हिट एक्सचेंजर व त्याचे भाग ---- | विहित प्रमाणपत्रे II. III. IV-A व बांधणी नकाशे |
| ३) प्रेशर व्हेसल्स (दाब पात्र)---- | विहित प्रमाणपत्रे II. III. IV-A व बांधणी नकाशे |
| ४) लहान औद्योगिक बाष्पक ---- | विहित प्रमाणपत्रे XVII , IV- A व बांधणी नकाशे |
| ५) मितोपयोजक व त्याचे भाग ---- | विहित प्रमाणपत्रे VII, VIII व बांधणी नकाशे |
| ६) वरील भागांच्या जोडण्या (स्टीम,फीड, ब्लो डाऊन पाईप)---- | विहित प्रमाणपत्रे III-A व बांधणी नकाशे |
| ७) बाक दिलेल्या नलिका ---- | विहित प्रमाणपत्रे III-B व बांधणी नकाशे |
| ८) माउंटींग्ज/फिटिंग्ज/व्हॉल्व (झडप) ---- | विहित प्रमाणपत्रे III-C |
| ९) डिश एंड आणि डिश एंड कवर ---- | विहित प्रमाणपत्रे III-I |
| १०) हेडर्स , ब्लोडाऊन टँक, अटेंपरेटर, डिएअरेटर इत्यादी | विहित प्रमाणपत्रे III-H |

| ०४. शासन पातळीवर निर्णय घेण्यासाठी सादर करावयाचे प्रकरण | |
|---|---|
| १ | बाष्पक अपवादात्मक परिस्थितीत प्रमाणपत्राच्या मुदतीनंतर पुढे चालू ठेवावयाचा असल्यास किमान ४५ दिवस अगोदर त्याबाबत अर्ज, निरीक्षण शुल्क भरणा केलेले प्राप्तपोच चलनासह प्राप्त झाल्यावर, बाष्पक निरीक्षण करुन बाष्पकाच्या अवस्थेनुसार शासनास त्याबाबत शिफारस केल्यावर शासनाकडून त्याबाबत आदेश प्राप्त झाल्यानंतर बाष्पक पुढे चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येते. |
| २ | बाष्पकाची निर्मात्याने दिलेली विहित स्वरुपातील प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास व त्याचे नोंदणी निरीक्षण करावयाचे असल्यास, त्याबाबतचा अर्ज नोंदणी निरीक्षण शुल्क भरणा केलेले प्राप्तपोच चलनासह प्राप्त झाल्यावर, बाष्पक निरीक्षण करुन बाष्पकाच्या नोंदणी निरीक्षणासाठी शासनास त्याबाबत शिफारस केल्यावर, शासनाकडून त्याबाबत आदेश प्राप्त झाल्यानंतर बाष्पकाची नोंदणी करण्यात येईल. |
| ३ | बाष्पकास बाष्पदाब चाचणीतून सूट मिळण्यासाठी, अर्ज प्राप्त झाल्यावर, त्याप्रमाणे शासनास शिफारस केल्यावर, शासनाकडून त्याबाबत आदेश प्राप्त झाल्यावर, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| टिप :- वरील प्रत्येक टप्प्याच्या निरीक्षणासाठी निर्मात्याने सादर केल्यावर अर्जाचे तारखेपासून २ दिवसांत निरीक्षण अधिकाऱ्यांची भेट दिली जाईल. | |

## ०५. बाष्पक परिचर नियम २०११ व बाष्पक प्रचालन नियम २०२१

बाष्पके अधिनियम १९२३, बाष्पक प्रचालन नियम २०२१ व बाष्पक परिचर नियम २०११ चा नियम ३ व ४ अनुसार सर्व बाष्पके, बाष्पक प्रचालन अभियंता/ बाष्पक परिचर प्रमाणपत्र धारण करणाऱ्या पात्र व्यक्तींच्या ताब्यात असणे आवश्यक आहे. म्हणून या विभागातर्फे बाष्पक प्रचालन नियम, २०२१ व बाष्पक परिचर नियम, २०११ चा नियम ९ अन्वये गठित केलेल्या परिक्षक मंडळातर्फे परिक्षा घेण्यात येतात.

परीक्षेची तारीख, स्थळ निश्चित झाल्यानंतर शासन राजपत्रात परीक्षेची तारीख व स्थळ जाहीर केले जाते. तसेच मुख्य कार्यालयाच्या व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर सुचनापत्राव्दारे जाहीर केल्या जातात. परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांना विहित अर्ज या कार्यालयाच्या website:www.mahaboiler.in वर उपलब्ध करुन दिले जातात. परीक्षेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येते. बाष्पक प्रचालन नियम, २०२१ व बाष्पक परिचर नियम, २०११ मधील नियम २६ अन्वये उमेदवाराने विहित नमुन्यात भरलेले अर्ज या कार्यालयास ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाचे असतात. अर्ज सादर झाल्यानंतर सदर अर्जाची छाननी करुन ऑनलाईन पध्दतीनेच पडताळणी करण्यात येते. ज्या उमेदवारांनी

आवश्यक बाबींची पुर्तता केली आहे अशा पात्र उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीनेच प्रवेशपत्र पाठविण्यात येतात व परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येते. तसेच परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांचे प्रमाणपत्रसुध्दा ऑनलाईन पध्दतीनेच उमेदवाराला पाठविण्यात येतात.

टिप :- विहित कालमर्यादा,विहित कागदपत्रे, मार्गदर्शक सूचना व अद्ययावत माहितीसाठी कृपया website:www.mahaboiler.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

## नियम - २४. पृष्ठांकन

भारताच्या इतर कोणत्याही राज्यातील तत्सम नियमान्वये परीक्षक मंडळाने बाष्पक परिचर म्हणून दिलेले प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय शिक्षुता अधिनियम-१९६१ अन्वये बाष्पक परिचर म्हणून त्या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई यांनी बाष्पक परीचर या व्यवसायातील दिलेले पदविका प्रमाणपत्र धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तींने पृष्ठांकनासाठी अर्ज केला असता, त्यास व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर म्हणून राज्यातील बाष्पकावर काम करणेकरीताप्रमाणपत्र विधीग्राहय ठरविण्यासाठी, मंडळाच्या अध्यक्षाकडून त्यावर पृष्ठांकन करुन घेणे नियमानुसार अनिवार्य आहे.

### प्रथम व द्वितीय श्रेणी बाष्पक परिचर प्रमाणपत्र पृष्ठांकनासाठी सर्वसाधारण सूचना

१) Website: www.mahaboiler.in संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या प्रपत्र-" अ " या विहित नमुन्यामध्ये उमेदवाराने अर्ज सादर करावा व अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावी.
२) माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र व गुणपत्रक मुळ व छायांकीत प्रती.
३) शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या मुळ व छायांकीत प्रती.
४) कारखान्यातील मुळ सेवा प्रमाणपत्र.
५) पृष्ठांकन शुल्क:- प्रथम व व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर क्षमता प्रमाणपत्रासाठी रु.१००/-
६) राष्ट्रीय व्यावसायिक प्रशिक्षण परिषदेचे (N.C.V.T.) राष्ट्रीय शिक्षुता प्रमाणपत्र/प्रशिक्षण महासंचालनालय (D.G.T.)/ महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ (M.S.B.V.E.) यांचे प्रमाणपत्र व गुणपत्रक.

**नियम-४४. नक्कल प्रत ( प्रमाणपत्राची दुसरी प्रत देणे)**

ज्यावेळी प्रमाणपत्राधारकाची चुक नसताना प्रमाणपत्र हरवले, चोरीस गेले किंवा नाश पावले किंवा खराब झाले या बद्दल मंडळाचे अध्यक्षांचे समाधान होईल अशा रितीने कागदपत्रांच्या पुराव्यांसह सिध्द करुन दिल्यास, उपनिर्दिष्ट अभिलेख्यावरुन त्याची दुसरी प्रत दिली जाते व असे प्रमाणपत्र सर्व प्रयोजनासाठी मुळ प्रमाणपत्राप्रमाणेच वैध असेल.

१) प्रपत्र-" अ " या विहित नमुन्यामध्ये उमेदवाराने अर्ज सादर करावा.

२) शुल्क रुपये २००/- रकमेचे चलन. (शुल्क ई-पेमेंटद्वारे ऑनलाईन पध्दतीने gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळावरुन भरावे.)

३) बाष्पक परीचर नियम-२०११ मधील नियम-४५ अनुसार रुपये १००/- च्या कोर्ट फी स्टॅम्पपेपरवरील दंडाधिकारी अथवा राजपत्रित अधिकारी यांच्यासमोर केलेले शपथपत्र. (सदर शपथपत्रामध्ये प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक, तसेच उक्त प्रमाणपत्र गहाळ झाल्याबाबत व तसेच मूळ प्रमाणपत्र परत मिळाल्यास या कार्यालयास परत करेल असे नमूद केलेले असावे.) (प्रथम व द्वितीय श्रेणी क्षमता प्रमाणपत्राकरिता)

४) बाष्पक प्रचालन नियम, २०२१ मधील नियम- अन्वये प्रमाणपत्र हरविल्याबाबत प्रथम माहिती अहवाल (FIR) (बाष्पक प्रचालन अभियंता प्रमाणपत्राकरिता)

५) उमेदवाराच प्रमाणपत्र जिर्ण झाले असल्यास उक्त शपथपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही ( मूळ प्रमाणपत्र सोबत जोडावे )

*संवेदनशील, विज्ञानधारित, प्रभावी व गतिमान प्रशासन*